**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय**
पुणे महानगरपालिका, पुणे
जा.क्र.: अतिमआ(ज)/साप्रवि/आस्था/ 36८८
दिनांक 30/07/2021

## आदेश

**विषय :-** पुणे महानगरपालिका प्रशासनाकडे 'उप आयुक्त' या पदावर कार्यरत श्रीमती रंजना गगे यांची सेवा तात्पुरती वर्ग करणेबाबत.

**संदर्भ :-** १) महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग यांचा शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२१/प्र.क्र.१४५/नवि-१४, दिनांक २९ जुलै २०२१.
२) मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) ठराव क्र. १/२९७ दि-30/07/2021

कोकण विभागात विशेषतः रत्नागिरी आणि रायगड जिल्यात महापुरामुळे उद्भवलेली आपत्कालीन परिस्थिती विचारात घेउन, स्थानिक नगरपरिषद कार्यक्षेत्रात नागरी व्यवस्थापन, आपती व्यवस्थापन कार्याचे समन्वयन, सर्व नागरी सेवांची उपलब्धता सुनिश्चित करणे, स्वच्छता व अनुषंगिक बाबींचा समन्वय साधणे यासाठी मुख्याधिकारी संवर्गातील अधिकाऱ्यांच्या सेवा आदेशाच्या दिनांकापासून तीन आठवड्यासाठी नगरपरिषद कार्यक्षेत्रात आपत्ती व्यवस्थापन कामासाठी संदर्भ क्र. १ च्या शासन आदेशान्वये वर्ग करण्यात आल्या आहेत.

सदर आदेशानुसार पुणे महानगरपालिका प्रशासनाकडे 'उप आयुक्त' या पदावर कार्यरत असलेल्या श्रीमती रंजना गगे, यांची सेवा खेड नगरपरिषद, जि. रत्नागिरी येथे आपत्ती व्यवस्थापन कामासाठी वर्ग करण्यात आलेली असल्याने श्रीमती रंजना गगे, उप आयुक्त यांना सदर ठिकाणी हजर होणेकामी पुणे महानगरपालिकेच्या सेवेतून दिनांक ३०/०७/२०२१ रोजी मध्यान्हपूर्व / मध्यान्होत्तर कार्यमुक्त करण्यात येत आहे.

श्रीमती रंजना गगे, उप आयुक्त यांचेकडील समाज कल्याण व समाज विकास विभागाचा अतिरिक्त पदभार श्री. रामदास रायाजी चव्हाण, मुख्य समाज विकास अधिकारी यांचेकडे आणि सांस्कृतिक व क्रीडा विभागाचा अतिरिक्त पदभार श्री. अविनाश सकपाळ, उप आयुक्त (झोनिपु) यांचेकडे पुढील आदेश होईपर्यंत सोपविण्यात येत आहे.

तरी, संबंधित खातेप्रमुख यांनी जरूर ती पुढील तजवीज करावी.

Raut
(रविंद्र बिनवडे)
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज)**
पुणे महानगरपालिका
30/7/2021

**प्रति :-**
१) **मा. आयुक्त तथा संचालक,** नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वारली, मुंबई.
२) **मा. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक,** कोकण विभाग, कोकण.
३) **मा. विभागीय आयुक्त,** पुणे विभाग, पुणे.
४) **मा. जिल्हाधिकारी,** रत्नागिरी.
५) **खातेप्रमुख (सर्व),** पुणे महानगरपालिका.